Annexure-VII

**मे. एसजीझेड व एसजीए शुगर्स (जे.व्ही.) लिमिटेड, गट नं.४६५, ४६६, ४६७ आणि ४९९, पोस्ट- तुरची, तालुका- तासगांव, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळण विस्तारिकरण क्षमता (३,५०० टीसीडी ते ८,००० टीसीडीपर्यंत), नविन ४०.० मेगावॅटचा सहविद्युत निर्मिती प्रकल्प, नविन १३५.० केएलपीडी आसवणी क्षमता प्रकल्प, १३५ केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरिट उत्पादन करण्यासाठी/ १२५ केएलपीडी एक्स्ट्रा न्युटल अल्कोहोल / १२५ केएलपीडी इथेनॉल आधारित बी/सी हेवी मोलॅसिस/शुगरकेन ज्युस/ ज्युस/सिरप/धान्यावर आधारित प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत.**

---

मे. एसजीझेड व एसजीए शुगर्स (जे.व्ही.) लिमिटेड, गट नं.४६५, ४६६, ४६७ आणि ४९९, पोस्ट- तुरची, तालुका- तासगांव, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळण विस्तारिकरण क्षमता (३,५०० टीसीडी ते ८,००० टीसीडीपर्यंत), नविन ४०.० मेगावॅटचा सहविद्युत निर्मिती प्रकल्प, नविन १३५.० केएलपीडी आसवणी क्षमता प्रकल्प, १३५ केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरिट उत्पादन करण्यासाठी/ १२५ केएलपीडी एक्स्ट्रा न्युटल अल्कोहोल / १२५ केएलपीडी इथेनॉल आधारित बी/सी हेवी मोलॅसिस/शुगरकेन ज्युस/ ज्युस/सिरप/धान्यावर आधारित प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक, २४ नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६६/२०२० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२०१११७-एफटीएस-००२० , दिनांक १७-११-२०२० अन्वये पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली त्यानुसार खालील प्रमाणे उपस्थिती होती.

१) डॉ. अभिजीत चौधरी, (भाप्रसे) - अध्यक्ष
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सांगली

२) श्री. रविंद्र आंधळे, - सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

३) नवनाथ अवताडे, - आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सांगली

श्री नवनाथ अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सांगली तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर, प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी समितीच्या अध्यक्षांचे, सदस्यांचे व प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री नवनाथ अवताडे यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स एसजीझेड व एसजीए शुगर्स (जे.व्ही.) लिमिटेड, गट नं.४६५, ४६६, ४६७ आणि ४९९, पोस्ट- तुरची, तालुका- तासगांव, जिल्हा- सांगली, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळण विस्तारिकरण क्षमता (३,५०० टीसीडी ते ८,००० टीसीडीपर्यंत), नविन ४०.० मेगावॅटचा सहविद्युत निर्मिती प्रकल्प, नविन १३५.० केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरिट आसवणी प्रकल्प किंवा १२५ केएलपीडी एक्स्ट्रा न्युटल अल्कोहोल किंवा १२५ केएलपीडी इथेनॉल आधारित बी/सी हेवी मोलॅसिस/केन ज्युस/ ज्युस/सिरप/धान्यावर आधारित प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज मप्रनि मंडळास प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग “अ” मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक, यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-

या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी अर्ज सादर केला होता त्यास केंद्र शासनाने मंजूरी प्रदान केली आहे.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळणे, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, सांगली यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक २४-१०-२०२० रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सांगली, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सांगली, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सांगली, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सांगली , तहसील कार्यालय-तासगाव, जिल्हा-सांगली, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय- -तुरची, निममणी, नेहरूनगर, येळावी, जुळेवाडी, ढवळी, राजापूर, तालुका- तासगांव, जिल्हा- सांगली, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - कोल्हापूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सांगली यांना एकही सूचना/तक्रार नोंदविण्यात आलेली नाही.

श्री नवनाथ अवताडे, आयोजक, यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकलपास ३५०.० कोटी रुपयांचा खर्च येणार असून केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार आसवणी प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज (ZLD) असेल. त्यांनी विविध प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती दिली.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी अतिशय चांगल्या प्रकारे सादरीकरण केलेले आहे. पर्यावरणाच्यादृष्टीने सर्व मुद्दे स्पष्टपणे सादर केलेले आहेत, उपाययोजनाही सांगितलेल्या आहेत. तरी परिसरातील नागरिक जे उपस्थित आहेत, त्यांनी सदरहू प्रकल्पाबाबतच पर्यावरणाचे काही आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित कराव्यात.

खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ **पर्यावरणविषयक जाहिर** जनसुनावणी **समिती यांनी स्पष्टिकरण दिले.**

१) श्री हेमंत वसंतराव पाटील, राहणार-येळावी, तालुका-पलुस, जिल्हा-सांगलीः-
उपरोक्त विस्तारिकरण प्रकल्पासाठी अतिरिक्त पाण्याची गरज लागेल. प्रकल्पास अतिरिक्त पाणी घेतल्याने शेतक-यांचे पाण्याबाबत काही नुकसान होईल काय?

उत्तर-

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे प्रकल्प उत्पादनात पाण्याचा कमीतकमी वापर होणार आहे. प्रकल्पात वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करुन त्या पाण्याचा प्रक्रियेत पुर्नवापर होणार आहे. त्यामुळे आता जेवढे पाणी घेतो त्यापेक्षा अतिरिक्त अल्पप्रमाणात पाण्याची गरज कमी भासेल, त्यामुळे कोणत्याही शेतक-याचे नुकसान होणार नाही, किंबहुना फायदाच होतो, कारण साखर कारखान्यातील सांडपाणी आम्ही प्रक्रिया करुन त्याचा शेतात वापर होतो. यावेळी जिल्हादंडाधिकारी, सांगली तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारले की

औद्योगिक सांडपाणी कुठे सोडण्यात येईल. त्यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी साधारण १,०३५ किलोलिटर प्रतिदिन पाणी प्रक्रिया करुन शेतीसाठी वापरण्यात येईल. त्याचवेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की जर स्थानिक शेतक-यांना प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची मागणी केल्यास त्यांच्याबरोबर करार करण्यात येऊन त्यांची मागणी पुरविण्यात येईल.

२) श्री गणेश पाटील, राहणार तुरची, तालुका- तासगांव, जिल्हा- सांगलीः-

कारखान्याचे सांडपाणी प्रक्रिया केल्यानंतर शेतकरी वापरु शकतील काय?

उत्तर-

प्रकल्प प्रवर्तकांनी येथे उत्तर दिले की आताच उत्तर दिल्याप्रमाणे साखर कारखान्यातील प्रक्रिया केलेले सांडपाणी हे कोणत्याही पीकाला उपयुक्त आहे. जर स्थानिक शेतक-यांनी तशी मागणी केली तर त्यांच्याशी करार करण्यात येऊन त्यांना प्रक्रिया केलेले सांडपाणी शेतीसाठी देण्यात येईल.

३) श्री बाबासाहेब पाटील, राहणार-तासगांव, जिल्हा-सांगलीः-

प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत कोळसा वापरण्यात येणार आहे. तरी कोळशापासून प्रदूषण न होण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत?

उत्तर-

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कोळशापासून सल्फरची निर्मिती होते. त्यासाठी अत्यंत आधुनिक अशी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर ही सयंत्रणा कार्यन्वित करण्यात येईल. सदरहू सयंत्रणा ही ९९.९९% कार्यक्षमता दर्शविते. त्यामुळे उत्सर्जित वायूमध्ये कोणतेही प्रदूषके असणार नाहीत व प्रदूषण होणार नाही.

४) श्री अतुल पाटील, राहणार-ढवळी, तालुका-तासगांव, जिल्हा- सांगलीः-

आसवणी प्रकल्पातील बॉयलरमधून मोठ्या प्रमाणात राख बाहेर पडेल. त्यामुळे सभोवतालच्या नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम न होण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आलेली आहे?

उत्तर-

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आताच उत्तर दिल्याप्रमाणे अत्यंत आधुनिक अशी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर ही सयंत्रणा कार्यन्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे ९९.९९% राख ही गोळा होईल. ती राख स्थानिक वीटभट्टी उत्पादकांना करार करुन उत्पादनासाठी व कंपोस्टमध्ये वापरण्यात येईल. त्यामुळे परिसरातील नागरिकांना राखेचा त्रास होणार नाही.

५) **श्री सचिन शिंदे, राहणार-ढवळी, तालुका-तासगांव, जिल्हा-सांगलीः-**

साखर व आसवणी प्रकल्पात सांडपाणी निर्माण होणार आहे. त्यावर काय उपाययोजना करण्यात येतील?

उत्तर-

साखर कारखान्यातील सांडपाण्यावर प्रकिया करुन ते शेतात वापरण्यात येणार आहे. तर आसवणी प्रकल्पातील सांडपाणी त्यास स्पेंट वॉश म्हणतो, त्याचे रुपांतर आपण पावडर स्वरुपात करणार आहोत. त्यात बरीच एनपीके/न्युट्रट्स असून आजूबाजूच्या कंपन्यांबरोबर तो शेतक-यांना विकण्यासाठी वाटाघाटी चालू आहेत. त्या कंपन्यांबरोबर आपण करार करणार आहोत.

६) श्री प्रसाद पेलवान, राहणार-तासगांव, तालुका-तासगांव, जिल्हा-सांगलीः-

कारखाना शेतक-यांना सेंद्रीय खत/कंपोस्ट खत देऊ शकेल काय?

उत्तर-

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रक्रिया केल्यावर जे सेंद्रीय खत/कंपोस्ट खत निर्माण होईल, ते माफक दराने शेतक-यांना देण्यात येईल.

७) श्री विजय विठ्ठल पाटील, राहणार-निमणी, तालुका-तासगांव, जिल्हा-सांगलीः-

उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारी राख व प्रेसमड परिसरातील शेतक-यांना देणार काय?

उत्तर-

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की निश्चितच परिसरातील शेतक-यांना प्रेसमड व राख देण्यात येईल.

८) श्री दिलिप पाटील, राहणार-नागांव, तालुका-तासगाव, जिल्हा-सांगलीः-

सद्या देत असलेल्या ऊस दरात वाढ होणार काय?

उत्तर-

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की सद्या कार्यरत साखर कारखाने हे नुसत्या साखर उत्पादनावर फायद्यात नसतात. म्हणून उप-पदार्थ उत्पादनाचा विचार करावाच लागतो. आता सहविद्युत प्रकल्प निर्मितीसाठी शासनाबरोबर सहा वर्षांचा करार असतो. आताच्या शासन धोरणाप्रमाणे आता ४.९९ ते ५.३० प्रति युनिट दर मिळतो. ते कारखान्यास अतिरिक्त उत्पन्न मिळणार आहे.

त्याचप्रमाणे आसवणी प्रकल्पात ईएनए, रेक्टीफाईड स्पिरिट व इथेनॉल ह्या उप-पदार्थांची निर्मिती होते. केंद्र शासनाने इथेनॉल बनविण्यास प्रोत्साहन दिलेले असून ३ ते ३.२५ रूपये

वाढ केलेली असल्याने कारखान्यास प्रतिलिटर ५५-६० रुपये अधिक उत्पन्न मिळू शकेल. त्यामुळे शेतक-यांना ऊसाचा अधिक मोबदला देण्यास मदत होणार आहे.

९) **श्री** विजय गणपती **पाटील,** राहणार-बांबवडे, तालुका-पलुस, जिल्हा-सांगलीः-
कारखान्याचे सिंचन योजना व दळणवळणाचे मार्गांसाठी काही नियोजन आहे काय?

उत्तर-

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रत्येक कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये ज्या क्षेत्रातून कारखान्यास ऊस मिळतो, तेथील रस्ते तयार करण्याची जबाबदारी जरी शासनाची वा स्थानिक स्वराज्य संस्थेची असते, तरी ज्या क्षेत्रातून किंवा जो शेवटचा शेतकरी ज्याच्याकडून ऊस कारखाना विकत घेतो, तेथील रस्ते दुरुस्त करण्याचे कारखाना जबाबदारी घेत आहे.

१०) **श्री रविंद्र आंधळे, प्रभारी प्रादेशिक** अधिकारी,मप्रनि मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीः-
प्रेस मडची विल्हेवाट कशी करण्यात येईल?

उत्तर-

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सॉईल कन्डिशनरप्रमाणे विल्हेवाट लावण्यात येईल. प्रेस मडमध्येही नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम अशी बरीच न्युट्रीयंटस आहेत. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी यास मप्रनि मंडळाकडून परवानगी मिळू शकते काय याबाबत विचारणा केली.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रेस मडला टनाला २५०-३०० रुपये भाव मिळतो. बरेच ठिकाणी प्रेस मड कंपोस्टमध्ये मिसळून विकतात.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी याबाबत निर्देश पाळण्यात येतील काय याबाबत विचारणा केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की केंद्र शासनाच्या नविन धोरणानुसार आसवणी प्रकल्प हा शून्य द्रव निस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) असणे बंधनकारक आहे. कंपोस्ट यार्ड कॉक्रिट लेअरने तयार करण्यात येईल व प्रेस मडमध्ये साखर कारखान्यातील स्पेंट वॉश मिसळण्यात येईल, नंतर उरलेला बॉयलरमध्ये जाळण्यात येईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितींना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले, त्यावेळी उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद आला नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांना विचारलेल्या आक्षेपकांना पर्यावरण सल्लागार यांनी योग्य उत्तरे/स्पष्टिकरण दिलेले आहे.

आयोजक यांनी सांगितले की बैठकीचे इतिवृत्त तयार करुन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक, स्थानिकांचे आभार मानले व माननीय अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

शेवटी श्री. नवनाथ सं. अवताडे, उप प्रादेशिक अधिकारी तथा पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे संयोजक यांनी समितीचे मा. अध्यक्ष, सदस्य तसेच सर्व उपस्थित नागरीक, कारखान्यांचे पदाधिकारी, तात्रिक सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी केलेल्या सहकार्याबददल आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने आजची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

उपरोक्त सुनावणीची कार्यवाही सकाळी ११-०० वाजता सुरु होवून दुपारी ०१-१५ वाजता समाप्त झाली.

(नवनाथ अवताडे)
आयोजक,
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,म. प्र. नि. मंडळ,
सांगली

(रविंद्र आंधळे)
सदस्य,
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ
कोल्हापूर

(डॉ. अभिजीत चौधरी,भाप्रसे)
अध्यक्ष,
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
सांगली,